# तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय, पुणे

४१२ई, के.एम. मुन्शी मार्ग, बहिरट पाटील चौक, शिवाजीनगर, पुणे - ४११ ०१६

फोन (020)25656234 ईमेल:ropune.dte@gmail.com संकेतस्थळ :www.ropune.org.in


जा.क्र. तंशिविकापु/विवि/२०१६-१७/ 5102 दिनांक : 22 DEC 2016

प्रति,
प्राचार्य/संचालक,
सोबतच्या यादीतील संस्था.

विषय :- महाराष्ट्र लोकसेवा आयोगामार्फत आयोजित परीक्षांकरिता शाळा/महाविद्यालये उपलब्ध करून देण्याबाबत

संदर्भ :- १. तंत्रशिक्षण संचालनालयाचे पत्र क्र. १२/आस्था(२) /२०१६/मलोआ/२८६१६ दि.०८.१२.२०१६

२ मा.अवर सचिव,महाराष्ट्र लोकसेवा आयोग ,मुंबई यांचे पत्र क्र.एमआयएस/०६१६/सीआर ५१/२०१६/तीन दि.०२.११.२०१६

उपरोक्त विषयाच्या अनुषंगाने वरील संदर्भीय पत्र या कार्यालयास प्राप्त झाली आहेत.महाराष्ट्र लोकसेवा आयोगामार्फत वेळोवेळी घेण्यात येणा-या परीक्षांच्यावेळी उपकेंद्र निश्चित करून घेण्यासाठी आपल्या संस्थेची माहिती सोबत दिलेल्या प्रपत्र-१ मध्ये भरून दि.२७.१२.२०१६ पर्यंत या कार्यालयाच्या ई-मेल ropune.dte@gmail.com वर पाठवावी.सदर परीक्षांचे आयोजन शक्यतो सार्वजनिक सुट्टीच्या दिवशी केले जाते.तसेच महाविद्यालयाची परीक्षेसाठी निवड झाल्यास प्रती उमेदवार रु.५/- याप्रमाणे सेवा शुल्क रोखीने अदा करण्यात येईल.सोबत संदर्भीय पत्रांची छायांकित प्रत जोडली आहे.

Gaikwad

सहसंचालकाकरिता
तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय
पुणे

TECHNICAL EDUCATION REGIONAL OFFICE, PUNE

LIST OF INSTITUTES SELECTED AS EXAM CENTERE FOR MPSC EXAMINATIONS

| Sr. No. | Institute Code | Institute Name | DISTRICT |
|---|---|---|---|
| 1 | 6017 | Government Polytechnic, Solapur | SOLAPUR |
| 2 | 6219 | KSGBS's Bharat- Ratna Indira Gandhi College of Engineering, Kegaon, Solapur | SOLAPUR |
| 3 | 6265 | Walchand Institute of Technology, Solapur | SOLAPUR |
| 4 | 6223 | Pradnya Niketan Education Society's Nagesh Karajagi Orchid College of Engineering & Technology, Solapur | SOLAPUR |
| 5 | 6409 | Solapur Education Society's Polytechnic, Solapur | SOLAPUR |
| 6 | 6270 | Rayat Shikshan Sanstha's Karmaveer Bhaurao Patil College of Engineering, Satara | SATARA |
| 7 | 6406 | Karmaveer Bhaurao Patil Polytechnic,Satara | SATARA |
| 8 | 6455 | Sandipani Charitable Trust, M.D. Jadhav Institute Of Technology.,Bhose | SATARA |
| 9 | 6007 | Walchand College of Engineering, Sangli | SANGLI |
| 10 | 6015 | Government Polytechnic, Miraj | SANGLI |
| 11 | 6266 | Shetkari Shikshan Mandal's Pad. Vasnatraodada Patil Institute of Technology, Budhgaon,(Diploma) Sangli | SANGLI |
| 12 | 6403 | Latthe Education Society's Polytechnic, Sangli | SANGLI |
| 13 | 6013 | Government Polytechnic, Pune | PUNE |
| 14 | 6020 | Cusrow Wadia Institute of Technology( Aided ), Pune | PUNE |
| 15 | 6027 | Maharashtra State Institute of Hotel Management & Catering Technology,Pune | PUNE |
| 16 | 6122 | The Shetkari Shikshan Mandal Sangli's Pd. Vasantdada Patil Institute of Technology, Bavdhan, Pune | PUNE |
| 17 | 6139 | Progressive Education Society's Modern College of Engineering, Pune | PUNE |
| 18 | 6141 | Jaywant Shikshan Prasarak Mandal's,Rajarshi Shahu College of Engineering, Tathawade, Pune | PUNE |
| 19 | 6144 | Genba Sopanrao Moze College of Engineering, Baner-Balewadi, Pune | PUNE |
| 20 | 6148 | MAEER's M.I.T. College of Engineering , Kothrud, Pune | PUNE |
| 21 | 6151 | Maharashtra Institute of Technology, Kothrud, Pune | PUNE |
| 22 | 6156 | Marathwada Mitra Mandal's College of Engineering, Karvenagar, Pune | PUNE |
| 23 | 6175 | Pimpri Chinchwad Education Trust, Pimpri Chinchwad College of Engineering, Pune | PUNE |
| 24 | 6177 | Sinhgad College of Engineering, Vadgaon (BK), Pune | PUNE |
| 25 | 6178 | Sinhgad Technical Education Society's Smt. Kashibai Navale College of Engineering,Vadgaon,Pune | PUNE |

| | | | |
|---|---|---|---|
| 26 | 6182 | Sinhgad Technical Education Society, Sinhgad Institute of Technology and Science, Narhe (Ambegaon) | PUNE |
| 27 | 6271 | Pune Institute of Computer Technology, Dhankavdi, Pune | PUNE |
| 28 | 6274 | Pune Vidyarthi Griha's College of Engineering and Technology, Pune | PUNE |
| 29 | 6278 | All India Shri Shivaji Memorial Society's College of Engineering, Pune | PUNE |
| 30 | 6281 | Modern Education Society's College of Engineering, Pune | PUNE |
| 31 | 6282 | All India Shri Shivaji Memorial Society's Institute of Information Technology,Pune | PUNE |
| 32 | 6285 | Bharati Vidyapeeth's College of Engineering for Women, Katraj, Dhankawadi, Pune | PUNE |
| 33 | 6298 | Zeal Education Society's Zeal College of Engineering & Reserch, Narhe, Pune | PUNE |
| 34 | 6408 | Bharti Vidyaapeeth's Jawaharlal Nehru Institute of Technology, Pune | PUNE |
| 35 | 6414 | Sinhgad Tech Education Society's Sou. Venutai Chavan Polytechnic, Pune | PUNE |
| 36 | 6415 | All India Shri Shivaji Memorial Society's Polytechnic, Pune, | PUNE |
| 37 | 6430 | Genba Sopanrao Moze Institute of Technology, Balewadi, Tal.Haveli | PUNE |
| 38 | 6435 | Zeal Education Society, Zeal Polytechnic, Narhe Tal. Haveli, Pune | PUNE |
| 39 | 6449 | Marathwada Mitra Mandal's Polytechnic, Pune | PUNE |
| 40 | 6141 | Jaywant Shikshan Prasarak Mandal's,Rajarshi Shahu College of Engineering, Tathawade, Pune | PUNE |
| 41 | 6176 | G. H.Raisoni Institute of Engineering and Technology, Wagholi, Pune | PUNE |
| 42 | 6404 | Ekalavya Shikshan Sanstha's Polytechnic,pune | PUNE |
| 43 | 6410 | Dr. D. Y. Patil Pratishthan's, Yashwantrao Bhaurao Patil Polytechnic, Pune | PUNE |
| 44 | 6413 | Pimpri Chinchwad Education Trust's Pimpri Chinchwad Polytechnic,Pune | PUNE |
| 45 | 6417 | Poona District Education Association's, Institute of Technology,Hadpsar,Pune | PUNE |
| 46 | 6010 | Government Polytechnic, Kolhapur | KOLHAPUR |
| 47 | 6250 | D.Y. Patil College of Engineering and Technology, Kolhapur | KOLHAPUR |
| 48 | 6402 | Shree Prince Shivaji Maratha Boarding House's New Polytechnic, Kolhapur | KOLHAPUR |
| 49 | 6421 | Dr. D. Y. Patil Prathisthan's Dr. D.Y. Patil Polytechnic, Kolhapur | KOLHAPUR |
| 50 | 6454 | D. Y. Patil Educational Socity's D.Y. Patil College Of Engineering & Polytechnic, Kolhapur | KOLHAPUR |
| 51 | 6825 | Dr. D.Y. Patil Pratishthan's Padmashree Dr.D.Y.Patil Polytechic, Kolhapur | KOLHAPUR |

महाराष्ट्र लोकसेवा आयोग
Maharashtra Public Service Commission

मुख्य कार्यालय : ५ १/२, ७ व ८ वा मजला, कुपरेज टेलिफोन निगम इमारत, महर्षि कर्वे मार्ग, कुपरेज, मुंबई ४०००२१ दूरध्वनी-२२७९५९०० फॅक्स:२२८८०५२४
फोर्ट कार्यालय : बँक ऑफ इंडिया इमारत, ३ रा माळा, फोर्ट, मुंबई ४००००१ दूरध्वनी :२२६७०२१०/१४८/२४८,२२१०२२२२, फॅक्स : २२६७३११५

ई-मेल – sec.mpsc@maharashtra.gov.in वेबसाईट - www.mpsc.gov.in, https://mahampsc.mahaonline.gov.in

क्र. एमआयएस-०६१६/सीआर-५१/२०१६/तीन दिनांक : २ नोव्हेंबर, २०१६.

प्रति,

संचालक, तंत्रशिक्षण,
महाराष्ट्र राज्य,
तंत्र शिक्षण संचालनालय,
३, महापालिका मार्ग,
मुंबई - ४०० ००१.

**विषय:- महाराष्ट्र लोकसेवा आयोगामार्फत आयोजित परीक्षांकरिता शाळा/महाविद्यालये उपलब्ध करुन देण्याबाबत.**

**संदर्भ :- (१) शासन परिपत्रक, सामान्य प्रशासन विभाग क्रमांक मलोआ-१०१२/ प्र.क्र.९५/१२/आठ, दिनांक ११ मे,२०१२.**

**(२) शासन परिपत्रक, उच्च व तंत्र शिक्षण, क्रमांक संकीर्ण-१११९/ (प्र.क्र.९/१५)/समन्वय, दिनांक २८ जानेवारी,२०१५.**

महोदय,

शासन सेवेतील विविध पदावर सुयोग्य व अर्हताप्राप्त व्यक्तींची निकोप पध्दतीने निवड करण्याकरीता भारतीय संविधानातील तरतुदीनुसार लोकसेवा आयोगाची निर्मिती करण्यात आली आहे. महाराष्ट्र शासनाच्या संबंधित विभागाच्या मागणीच्या आधारे शासन सेवेतील विविध पदांवरील भरतीकरीता आयोगामार्फत वेळोवेळी परीक्षांचे आयोजन केले जाते. संबंधित भरतीकरीता प्राप्त झालेल्या अर्जाची संख्या लक्षात घेऊन मुंबईसह महाराष्ट्रातील सर्व जिल्हा मुख्यालयाच्या ठिकाणी वर्षभर शक्यतो सार्वजनिक सुटटीच्या दिवशी आयोगाच्या परीक्षांचे आयोजन केले जाते.

२. शासन निर्णय, सामान्य प्रशासन विभाग, क्रमांक पीएससी-१००८/५९०/सीएस-१०९/आठ, दिनांक १५ ऑक्टोबर, १९८२ नुसार राज्यातील खेडयापाडयामधील गरीब व होतकरु व्यक्तींना आयोगामार्फत आयोजित परीक्षांची संधी प्राप्त व्हावी, या हेतूने जिल्हा केंद्रावरील आयोगाच्या परीक्षांचे आयोजन संबंधित जिल्हाधिकारी यांच्याकडे सोपविण्यात आले असून जिल्हा केंद्रावरील परीक्षा व्यवस्थित व सुरळितपणे पार पाडण्याची जबाबदारी संबंधित जिल्हाधिकारी यांची आहे. परीक्षेकरीता शाळा/महाविद्यालये उपलब्ध करुन देण्याबाबत तसेच संबंधित कायद्यातील तरतुदीनुसार शाळा/महाविद्यालयांचे अधिग्रहण करण्याबाबत संदर्भिय शासन परिपत्रकाद्वारे शासनाकडून आदेश जारी करण्यात आले आहेत.

३. महाराष्ट्र शासनाच्या संबंधित विभागाच्या मागणीच्या आधारे परीक्षा घेण्याचे निश्चित झाल्यास आयोगाच्या कार्यालयाकडून परीक्षांकरीता उमेदवारांची अंदाजित संख्या जिल्हाधिकारी यांना कळवून जिल्हा मुख्यालयाच्या ठिकाणी असलेल्या शाळा/महाविद्यालयांची नांवे उपलब्ध करुन देण्याची विनंती करण्यात येते. त्यानुसार, संबंधित जिल्हाधिकारी कार्यालयाकडून एखाद्या परीक्षेच्या दिनांकास उपलब्धतेसंदर्भात शाळा/महाविद्यालयाशी पत्रव्यवहार करण्यात येतो. तसेच सदर दिनांकास उपलब्धतेसंदर्भात शाळा/महाविद्यालयांचे होकार प्राप्त झाल्यानंतर जिल्हाधिकारी कार्यालयाकडून परीक्षेकरीता आयोगास शाळा/महाविद्यालयांची नांवे कळविण्यात येतात.

४. परीक्षेस प्रवेश देण्यात येणा-या उमेदवारांची संख्या अर्ज स्वीकारण्याच्या अंतिम दिनांकानंतर निश्चित होते. त्यानंतर, परीक्षेच्या आयोजनासाठी उपलब्ध होणारा कालावधी अत्यंत अल्प असतो. प्रत्येक परीक्षेकरीता अर्ज करणा-या उमेदवारांची संख्या निश्चित नसल्यामुळे प्रत्येक परीक्षेच्यावेळी प्रवेश देण्यात येत असलेल्या उमेदवारांची संख्या वेगवेगळी आहे. प्रत्येक जिल्हा केंद्रावरील सर्व शाळा/महाविद्यालयाच्या क्षमतेबाबतची निश्चित संख्या आयोगाकडे उपलब्ध नाही. आयोगामार्फत प्रसिध्द करण्यात येणा-या जाहिरातीस अनुसरुन सर्व अर्ज ऑनलाईन पध्दतीने मागविण्यात येत असल्यामुळे व शाळा/महाविद्यालयाच्या क्षमतेबाबतची माहिती निश्चित नसल्यामुळे संगणकीय संस्करणासाठी तांत्रिक अडचणी उदभवत असल्याचे आणि त्याचा परिणाम परीक्षा आयोजनावर होत असल्याचेही

निर्देशनास येत आहे. आयोगामार्फत आयोजित परीक्षांचे स्वरुप अत्यंत संवेदनशील असते व त्यामध्ये कोणत्याही टप्प्यावर त्रुटी राहिल्यास अनंत अडचणी उदभवून परीक्षा व्यवस्थित व सुरळितपणे आयोजित करण्यास मर्यादा येतात. सदर अडचणींचे निराकरण करण्यासाठी प्रत्येक जिल्हा केंद्रावरील शाळा/महाविद्यालयाच्या क्षमतेबाबतची माहिती संकलित करण्याचा आयोगाने निर्णय घेतला आहे.

५. प्रत्येक जिल्हा केंद्रावरील शाळा/महाविद्यालयाच्या क्षमतेबाबतची माहिती ही केवळ संगणक संस्करणासाठी संकलित करण्यात येणार आहे. त्याच्या आधारे जिल्हाधिकारी कार्यालयाच्या परस्पर आयोगाकडून संबंधित परीक्षेसाठी उपकेंद्र निश्चित करण्यात येणार नाही. प्रचलित पध्दतीनुसार जाहिरात प्रसिध्द झाल्यानंतर आयोगाच्या कार्यालयाकडून जिल्हाधिकारी कार्यालयाकडे उपकेंद्र निश्चितीबाबत पत्रव्यवहार करण्यात येईल. जिल्हाधिकारी कार्यालयाकडून परीक्षेच्या दिनांकास उपलब्धतेसंदर्भात शाळा/महाविद्यालयांकडे पत्रव्यवहार करण्यात येईल. तसेच, शाळा/महाविद्यालय यांच्याकडून प्राप्त होणा-या संमतीच्या अधीन फक्त जिल्हाधिकारी कार्यालयाकडून प्राप्त होणा-या शाळा/महाविद्यालय यादीच्या आधारेच संबंधित परीक्षेसाठी उपकेंद्र निश्चित करण्यात येतील.

६. वर नमूद केल्याप्रमाणे संगणक संस्करणासाठी महाराष्ट्रातील आपल्या अधिपत्याखालील सर्व शाळा/महाविद्यालयांच्या क्षमतेबाबतची माहिती कृपया सोबतच्या **प्रपत्र-१** द्वारे विहित करण्यात आलेल्या नमुन्यात उपलब्ध करुन देण्यात यावी.

७. जिल्हा केंद्रावरील शाळा/महाविद्यालयाची माहिती संकलित करताना कृपया खालील बाबींची कटाक्षाने अनुपालन करण्यात यावे:-

(१) जिल्हा मुख्यालयाच्या नजिकच्या ३० कि.मी. त्रिजेच्या परिसरातील व वाहतुकीच्या दृष्टीने सोयीच्या अशा सर्व शासन मान्य अनुदानित /विना अनुदानित/अभिमत/केंद्रिय शाळा/महाविद्यालयांची माहिती संकलित करावी.

(२) पारंपारिक शाळा/महाविद्यालयासोबत तांत्रिक, कृषि, अभियांत्रिकी, तंत्रनिकेतन, युनानी, फार्मसी, वैद्यकीय, व्यावसायिक, पदवी, पदव्युत्तर इत्यादी स्वरुपाच्या सर्व शाळा/महाविद्यालयांची माहिती संकलित करावी.

(३) प्रत्येक बाकावर एक याप्रमाणे संबंधित शाळा/महाविद्यालयांमध्ये प्रत्यक्ष किती उमेदवारांची बैठक व्यवस्था होऊ शकते, याची तपासणी करुनच माहिती देण्यात यावी.

(४) आयोगाच्या परीक्षेला बसणारे उमेदवार सर्वसाधारणपणे पदवीधारक असतात, ही बाब लक्षात घेऊन उमेदवारांच्या बैठक व्यवस्थेसाठी वापरण्यात येणारी बाके व्यवस्थित आहेत काय, त्यावर परीक्षार्थी उमेदवारांना व्यवस्थित लिहिता येते काय, तसेच, ती शिशु वर्गातील विदयार्थ्यांच्या वापरातील नाहीत; याची प्रथम खात्री करावी.

(५) संगणक संस्करणासाठी माहिती संकलित करण्यात येत असून प्रत्यक्ष परीक्षेच्या वेळी संबंधितांशी लेखी पत्रव्यवहाराद्वारे खातरजमा केल्यानंतरच परीक्षेसाठी शाळा/महाविद्यालयांची निवड करण्यात येईल, असे सुस्पष्टपणे संबंधितांना कळविण्यात यावे.

(६) शाळा/महाविद्यालयाची आयोगाच्या परीक्षेसाठी निवड झाल्यास प्रति उमेदवार रुपये ५/- याप्रमाणे सेवा शुल्क रोखीने अदा करण्यात येईल; असेही संबंधितांना कळविण्यात यावे.

८. सदर माहिती फक्त एकावेळीच संकलित करावयाची असून त्याच्या आधारे आयोगामार्फत आयोजित परीक्षांचे काम सुलभ होणार आहे.

९. नजिकच्या काळामध्ये आयोगामार्फत आयोजित परीक्षांचा भरगच्च कार्यक्रम लक्षात घेऊन प्रस्तुत प्रकरणी प्राथम्याने कार्यवाही करुन आवश्यक माहिती सोबतच्या विहित प्रपत्राद्वारे **दिनांक ३० नोव्हेंबर, २०१६** पर्यंत उपलब्ध करुन देण्याची कृपया व्यवस्था करावी, अशी विनंती आहे.

१०. परीक्षेच्यावेळी उपकेंद्र निश्चित करुन घेण्याच्या कामाकरीता अधिक पाठपुराव्यासाठी आपल्या अधिपत्याखालील सर्व विभागीय कार्यालये/सहसंचालक/उपसंचालक/शिक्षण अधिकारी यांची नावे, संपूर्ण पत्ता, कार्यालयीन दूरध्वनी क्रमांक आयोगास कृपया तातडीने उपलब्ध करुन देण्याचीही व्यवस्था करावी. जेणेकरुन ऐनवेळी त्यांच्याशी थेट संपर्क साधता येईल. तसेच, आयोगाच्या मागणीनुसार त्यांच्या अधिपत्याखालील शाळा/महाविद्यालये तातडीने उपलब्ध करुन देण्याची व्यवस्था करण्याबाबतही संबंधितांना कृपया निर्देश देण्यात येईल.

आपला विश्वासू,

(सु.ह. अवताडे)
अवर सचिव,
महाराष्ट्र लोकसेवा आयोग, मुंबई.

सोबत :- प्रपत्र-१

PROFORMA - 1

**NOTE : Provide information floor wise and total at bottom**

| DTE Institute Code | NAME OF INSTITUTE | FULL ADDRESS | TELEPHONE NO. with STD CODE | Email Address | Floor | No. of class rooms | No. of benches in each class room | No.of Candidates to be accommodated (One Candidate per Bench) |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | | GROUND | | | |
| | | | | | FIRST | | | |
| | | | | | SECOND | | | |
| | | | | | THIRD | | | |
| | | | | | | | TOTAL | |

SEAL AND SIGN. OF PRINCIPAL